प्रकरण क्रमांक १०३८ : ठाणे महानगरपालिकेचे सन २०१२-२०१३, सन २०१३-२०१४ व सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षाचे लेखा विवरण पत्र ( जमा खर्च व ताळेबंद ) मान्यता मिळणेबाबतचे प्रकरण ३५(अ) नुसार अवलोकनार्थ सादर.

**मा. सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक ७०५ दिनांक : १४/०९/२०१७**

ठराव :

प्रकरणी कागदपत्र व कार्यालयीन अहवाल पाहता , महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९४ नुसार परिवहन उपक्रमाच्या प्रशासना व्यतिरिक्त महापालिकेच्या अन्य प्रशासनासबंधी तपशिलवार अहवाल व सदर वर्षातील महानगरपालिकेच्या निधीच्या खाती जमा / खर्च झालेल्या संवितरीत केलेल्या व वर्षाच्या अखेरीस निधी जमा / खर्च झालेल्या रक्कम दर्शविणारे विवरणपत्र तयार करुन मा. स्थायी समितीस सादर करावी अशी तरतूद आहे. त्यानुसार प्रशासनाने द्विनोंद लेखा पध्दती अंतर्गत सन २०१२-२०१३, सन २०१३-२०१४ व सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षाचे लेखा विवरण पत्र दिनांक ३१/३/२०१३ , दिनांक ३१/३/२०१४, दिनांक ३१/३/२०१५ चा ताळेबंद व जमा / खर्च विवरणपत्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९४ नुसार मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. परंतु मा.स्थायी समिती अद्यापपर्यंत गठीत न झाल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३५ (अ) नुसार मा.सर्वसाधारण सभा मान्यता देत आहे.

सुचक:- श्री. नरेश म्हस्के

अनुमोदक:- मिलींद पाटील

बहुमताने मंजूर...

महापौर,
ठाणे महानगरपालिका ठाणे

(मा. आयुक्त सो. यांजकडे माहितीसाठी सादर.)